# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर  वर्ष ४ थे  अंक २३३ वा रविवार दि.०९ मार्च २०२५  पृष्ठे ४  स्वागत मूल्य २ रू.


## लाडकी बहीण योजना फसवी; राज्यात महिला वर्गाची फसवणूक : संजय राऊत



मुंबई : लाडकी बहीण योजना किती फसवी आहे ते आपण निवडणुकीनंतर पाहिले. निवडणुकीनंतर लाडक्या बहिणींना २१०० रुपये देणार होते. आता संबंधित खात्याच्या मंत्री महिला आहेत, त्यांनी ते शक्य नाही सांगितले, ही महिलांची फसवणूक असून शासनाच्या तिजोरीवर भार पडत आहे, असा दावा संजय राऊत यांनी केला आहे.

खासदार संजय राऊत म्हणाले, आज जागतिक महिला दिन आहे. पण महाराष्ट्राची गेल्या काही महिन्यांतील अवस्था पाहिल्यास महिलांवर होणारे अत्याचार देशात सर्वाधिक आहेत. मंत्री त्यात सामील आहेत. सरकारी पक्षाचे लोक सामील आहेत. पोलिसांवर दबाव आहे. लाडकी बहीण योजनेसारख्या माध्यमातून दीड हजार रुपये तुम्हाला दिले म्हणजे महिला सुरक्षित आहेत आणि आम्ही महिलांचे हितरक्षक आहोत, या भूमिकेत जर सरकार असेल तर ते सरकार समस्त महाराष्ट्र आणि महिलावर्गाची फसवणूक करत आहे, अशी टीका त्यांनी केली.

मला काल काही वृद्ध कलाकार भेटले. त्यांना दर महिन्याला सरकारकडून काही मानधन मिळते. मात्र, लाडकी बहीण योजना आल्यापासून त्यांचे मानधन मिळाले नाही. ही आर्थिक अवस्था या राज्याची आहे. आर्थिक पाहणी अहवाल आला आहे, त्यावरच बोट दाखवले. हे राज्य कर्जाच्या ओझ्याखाली चिरडत आहे. या राज्यामध्ये आर्थिक अराजक माजले आहे, अशा शब्दांत त्यांनी सरकारवर निशाणा साधला.

## आज सावित्रीबाई फुले यांच्या विचारांची देशाला गरज-शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे





लातूर-महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई जिल्हा शाखा लातूर आयोजित जागतिक महिला दिनानिमित्त सन्मान महिलांचा या सोहळ्यात लातूर येथील शिक्षणाधिकारी प्राथमिक वंदनाताई फुटाणे प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होत्या.

यावेळी विचार पिठावर पोलीस उपाधीक्षक (गृह) गजानन भातलवंडे, प्रा. सविता कीर्त-उबाळे, माजी महापौर स्मिता खानापुरे, भाजपा प्रवक्त्या प्रेरणा होनराव,ज्येष्ठ पत्रकार शशिकांत पाटील उपस्थित होते तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून पत्रकार संघाचे प्रदेश उपाध्यक्ष अशोक देडे होते.

पुढे बोलताना शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे म्हणाले की, या देशांमध्ये सावित्रीबाई फुले यांच्या विचाराची गरज असून सावित्रीबाई यांच्या विचारांच्या महिला तयार होणे गरजेचे आहे. आज महिला अबला नसून त्या सबला झाल्या पाहिजे. महिलांनी या डिजिटल युगामध्ये सक्रिय सहभाग नोंदवला पाहिजे आणि महिला या अतिशय सक्षमपणे त्यांनी आपल्या विविध क्षेत्रांमध्ये काम केलं पाहिजे असेही त्या शेवटी म्हणाल्या.


यावेळी गजानन भातलवंडे , प्रा.सविता कीर्त-उबाळे, स्मिता खानापुरे, प्रेरणा होनराव, शशिकांत पाटील आदींचे मार्गदर्शन झाले.

या जागतिक महिला दिनानिमित्त विविध क्षेत्रांमध्ये काम करणाऱ्या यशस्वी महिलांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करून त्यांना प्रशस्तीपत्र, शाल, पुष्पहार व महामानवांचे ग्रंथ देऊन सन्मान करण्यात आला. यामध्ये प्रशासकीय पुरस्कार पोलीस निरीक्षक बबीता वाकडकर, आरोग्यामध्ये डॉ. सुवर्णा बिराजदार, गृहणी मध्ये सुरेखा कालिदास माने,शैक्षणिक डॉ.सारिका कदम, सुशीला वाघमारे,सामाजिक पुरस्कार शारदा हजारे,उषा सोनकांबळे तर बचत गटामध्ये उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल आरती महामुनी, यशस्वी उद्योजक ललिता बावलगे तर सांस्कृतिक क्षेत्रामधील टीव्ही स्टार तनुजा शिंदे व युट्युब रील स्टार मेगा पवार तर सरपंच म्हणून गीतांजली हाणमंते यांचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक पत्रकार संघाचे सरचिटणीस अशोक हनवते, सूत्रसंचालन प्रा. यु.डी. गायकवाड तर शेवटी आभार शहराध्यक्ष महादेव डोंबे यांनी मांनले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष अफसर कारभारी, जिल्हा संघटक सुधाकर फुले, जिल्हा उपाध्यक्ष लिंबराज पन्हाळकर, जिल्हा कोषाध्यक्ष अरुण कांबळे, मीडिया सेलचे जिल्हाध्यक्ष मनीष हजारे, हरून मोमीण, खय्युम शेख, तानाजी जाधव आदीसह या सोहळ्यासाठी शिक्षक नेते कालिदास माने, सामाजिक कार्यकर्ते बसवंत उबाळे, शेषेराव वाघमारे,उत्तम कांबळे, सुरेश सोनकांबळे, गुरुदत्त सूर्यवंशी, गोविंद कुंभार, बालाजी घोडके, ज्ञानेश्वर सुरवसे आदीसह महिला रचना देडे विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## परचंडा येथील श्री रोकडोबा हनुमान मंदिरात कराड परिवाराकडून नवसपुर्ती



लातूर : - भाजपाचे नेते रमेशआप्पा कराड आमदार व्हावेत यासाठी अहमदपूर तालुक्यातील मौजे परचंडा येथील श्री रोकडोबा हनुमान या देवस्थानाकडे ॲड. गोपाल मदनलाल काबरा यांनी केलेला नवस पूर्ण करण्यासाठी भाजपाचे युवा नेते ऋषिकेशदादा कराड आणि कराड परिवाराच्या वतीने ८ मार्च शनिवार रोजी परचंडा येथे श्री रोकडोबांची महापूजा केली.

असंख्य भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या अहमदपूर तालुक्यातील मौजे परचंडा येथील श्री रोकडोबा हनुमान देवस्थान हे जागृत देवस्थान म्हणून सर्वदूर परिचित आहे. भाजपाचे नेते रमेशआप्पा कराड यांच्यावर प्रेम करणारे परचंडा येथे तब्बल १५ वर्ष सरपंच म्हणून कार्य केलेले ॲड. गोपाल मदनलाल काबरा यांनी या देवस्थानाकडे लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातून रमेशआप्पा विजयी होऊन आमदार व्हावेत असा नवस निवडणुकी दरम्यान केला होता. विधानसभा निवडणुकीचा निकाल जाहीर होऊन रमेशआप्पा विजयी झाल्याचे घोषित झाले असता आपली इच्छा रोकडोबांनी पूर्ण केली या भावनेतून काबरा यांना प्रचंड आनंद झाला.

आप्पांच्या विजयाची नवसपुर्ती करण्यासाठी कराड परिवारानी श्री रोकडोबा देवस्थानात अभिषेक, महापूजा करावी ही काबरांची इच्छा होती त्यानुसार शनिवार ८ मार्च रोजी भाजपाचे युवा नेते ऋषिकेशदादा कराड यांनी परचंड येथे जाऊन श्रीक्षेत्र रोकडोबाचा अभिषेक केला, महापूजा व आरती करून मनोभावे दर्शन घेतले. यावेळी कराड परिवारातील आमदार रमेशआप्पा कराड यांच्या सुविद्य पत्नी सौ. संजीवनीताई कराड, भाजपाचे नेते राजेश कराड, सौ शुभांगीताई राजेश कराड त्याचबरोबर सीए ॲड. गोपाल मदनलाल काबरा, पत्नी सौ. गंगादेवी गोपाल काबरा, मुलगा सीए अमोल काबरा आणि सीए सौ. नेहा काबरा व इतर अनेक जण होते.

याप्रसंगी ॲड. गोपाल काबरा यांनी राजेश कराड आणि ऋषिकेश कराड यांचा तर सौ. गंगादेवी काबरा यांनी सौ. संजीवनीताई कराड सौ. शुभांगीताई कराड यांचा यथोचित सत्कार केला. यावेळी भाजपाचे ज्येष्ठ नेते त्रिंबकआबा गुट्टे, ॲड. भारत चामे, परचंडा येथील सरपंच शिवकुमार हिप्परगे, बालाजी मुंडे, गणेश मुंडे, भारत शेळके, शिवा शेळके यांच्यासह अनेक जण उपस्थित होते.

## मनपा उपायुक्त खानसोळे यांची महात्मा बसवेश्वर मनपा शाळेस अचानक भेट





लातूर /प्रतिनिधी :- लातूर शहर महानगरपालिकेचे उपायुक्त डॉ.पंजाबराव खानसोळे यांनी शनिवारी (दि. ८)महात्मा बसवेश्वर विद्यालय, मनपा शाळा क्रमांक ०६, बसवेश्वर चौक येथे अचानक भेट देऊन शाळेची पाहणी केली.शैक्षणिक गुणवत्ता विकासासाठी आवश्यक त्या सुविधा व प्रयत्नांचा आढावा घेण्यासह शाळेच्या अडचणी जाणून घेण्यासाठी त्यांनी ही भेट दिली.भेटीदरम्यान ४७ विद्यार्थी पटसंख्या असलेल्या या शाळेमध्ये मुख्याध्यापक महेश तोडकर आणि सहशिक्षक सतिश चव्हाण हे विद्यार्थ्यांना शिकवताना आढळले. विशेष म्हणजे शाळेतील संपूर्ण अध्यापन प्रक्रिया डिजिटल आहे. विद्यार्थ्यांची उपस्थिती लक्षणीय असून शालेय परिसर स्वच्छ व सुसज्ज असल्याचे पाहून उपायुक्त खानसोळे यांनी समाधान व्यक्त केले.

शाळेतील भौतिक सुविधा अधिक कशा वाढवता येतील याबाबत त्यांनी शिक्षकांसोबत चर्चा केली. विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहारासंदर्भात माहिती विचारली. दररोज दिल्या जाणाऱ्या मेनूबाबत चौकशी करून शालेय पोषण आहार अधिक चविष्ट व पौष्टिक कसा देता येईल ? याबाबत मार्गदर्शन केले.

उपायुक्त खानसोळे यांनी विद्यार्थ्यांसोबत थेट संवाद साधला. त्यांनी मराठीत वाक्य बोलून दाखवली असता विद्यार्थ्यांनी ती तत्परतेने इंग्रजीत अनुवादित करून सादर केली. खासगी इंग्रजी माध्यमाच्या नामांकित शाळांनाही लाजवेल अशी इंग्रजी भाषेची प्रगती या शाळेत पाहून समाधान वाटते, असे मत उपायुक्तांनी व्यक्त केले. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे उपायुक्त डॉ.पंजाबराव खानसोळे यांच्या प्रयत्नांमुळे संपूर्ण शाळेमध्ये सुरक्षिततेच्या दृष्टीने सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे त्यांनी पुरवलेल्या डिजिटल संचाचा या शाळेत योग्य व परिणामकारक वापर होत असल्याचेही निदर्शनास आले.

डॉ.पंजाबराव खानसोळे यांनी लातूर शहर महानगरपालिका उपायुक्त पदाचा कार्यभार स्वीकारल्यापासून महानगरपालिकेच्या शाळांच्या शैक्षणिक गुणवत्ता विकासावर विशेष भर दिला आहे. त्यांच्या प्रयत्नांचे फलितही दिसू लागले असून महानगरपालिका शाळांमध्ये वैशिष्ट्यपूर्ण गुणात्मक बदल होत असल्याचे निदर्शनास येत आहे. कार्यक्रमादरम्यान शाळा क्रमांक सहाच्या विद्यार्थ्यांनी पुणे येथे आयोजित राज्यस्तरीय सांस्कृतिक कार्यक्रम स्पर्धेत मिळवलेले पुरस्कार उपायुक्त पंजाबराव खानसोळे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

उपायुक्तांनी सर्व शिक्षकांना शाळेची अधिकाधिक गुणवत्तापूर्ण सुधारणा कशी साध्य करता येईल याबाबत मार्गदर्शन केले. शाळा विकासातील अडचणी दूर करण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील राहील,असे आश्वासनही त्यांनी दिले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न करण्याचे आवाहन करून त्यांनी उपस्थित शिक्षकाना प्रोत्साहित केले. या भेटीत उपायुक्त खानसोळे यांच्या सोबत मनपाचे आरोग्य अधिकारी डॉ. शंकर भारती तसेच लिपिक पाटील हेही उपस्थित होते.

## जाजू हॉस्पिटलच्या वतीने आयोजित मोफत आरोग्य शिबिरात १३५ रुग्णांची तपासणी



लातूर : जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून लातूर शहरातील खर्डेकर स्टॉप, औसा रोड परिसरातील जाजू हॉस्पिटलच्या नूतन वास्तूमध्ये आयोजित करण्यात आलेल्या मोफत स्त्री रोग व अस्थिरोग तपासणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात १३५ महिला - पुरुष रुग्णांची तपासणी व उपचार करण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून सौ. सुनंदा मग्गीरवार , ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. हरिप्रसाद सोमाणी यांची उपस्थिती होती. धन्वंतरी प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलनाने शिबिराचे उदघाटन करण्यात आले. या शिबिरात ४५ वर्षांपुढील सहभागी महिला रुग्णांची मोफत हाडांची ठिसूळता तपासणी करण्यात आली. तर सोनोग्राफी - एक्स - रे, रक्त तपासणी, फिजिओथेरपीवर ५० टक्के सूट तसेच शस्त्रक्रियेवर २५ टक्के सूट देण्यात आली. शिबिरात सहभागी झालेल्या महिला रुग्णांना उपलब्धतेनुसार औषधेही मोफत देण्यात आली. यावेळी आपले विचार व्यक्त करताना सौ. सुनंदा मग्गीरवार यांनी समाजाने या आधूनिक युगात येईपर्यंत महिलांना किती त्रास सहन करावा लागला याची जाणीव ठेवून चालणे आवश्यक आहे असे सांगितले. समाज जीवनात वावरताना महिलांना संघर्षांतून वाटचाल करावी लागते. त्यामुळे महिलांकडे दुर्लक्ष होता कामा नये. महिलांच्या कर्तृत्वाचा सन्मान झालाच पाहिजे. आज महिला सगळ्याच क्षेत्रात पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करत आहेत. महिलांना कोणत्याही बाबतीत कमी लेखण्याची चूक कदापि होता कामा नये, अशी अपेक्षा व्यक्त करून त्यांनी सर्व महिला भगिनिंना महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

डॉ. हरिप्रसाद सोमाणी यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सामाजिक जाणिवेतून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे सांगितले. समाजात संस्कृती, संस्कार, परंपरेचे जतन केवळ महिलांमुळेच टिकून आहेत, हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. मुलगी , पत्नी, आई अशा अनेक भूमिका महिलांना पार पाडाव्या लागतात . अशा वेळी त्यांच्या आरोग्याची प्राधान्याने काळजी घेणे आवश्यक असल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्तविक अस्थिशल्य चिकित्सक डॉ. चेतन जाजू यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी या उपक्रमाच्या आयोजनामागची पार्श्वभूमी विषद केली. डॉ. रचना जाजू यांनीही यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी ज्येष्ठ पॅथॉलॉजिस्ट डॉ. रमेशचंद्र जाजू, डॉ. वसुधा जाजू, बालरोग तज्ज्ञ डॉ. मनोज शिरूरे , व्यवस्थापक वसीम कादरी यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. महिला दिनाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

## मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेचा जास्तीत जास्त युवक - युवतींनी लाभ घेण्याचे आवाहन

लातूर :- राज्यातील युवकांना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देवून नोकरी मिळण्याची त्यांची क्षमता वाढविण्यासाठी 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना' २०२४-२५ या आर्थिक वर्षापासून सुरू करण्यात आली आहे. या माध्यमातून उद्योजक, खासगी क्षेत्रातील आस्थापना, सेवा क्षेत्र आस्थापनांना मनुष्यबळ मिळणार आहे. यासाठी बारावी पास प्रशिक्षणार्थींना ६ हजार, आयटीआय, पदविका ८ हजार आणि पदवीधर, पदव्युत्तर प्रशिक्षणार्थ्यांना १० हजार प्रतिमाह विद्यावेतन मिळणार आहे. या योजनेचा जिल्ह्यातील जास्तीत जास्त युवक - युवतींनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहाय्यक आयुक्त बालाजी मरे यांनी केले आहे.

लघु आणि मध्यम व मोठे उद्योग यांना आवश्यक असलेल्या मनुष्यबळाची मागणी या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने नोंदविलेली आहे. या कार्य प्रशिक्षण योजनेतर्गत प्रशिक्षणार्थींना त्यांच्या शैक्षणिक अर्हतेप्रमाणे विभागामार्फत विद्यावेतन दिले जाईल. प्रशिक्षणार्थीचे विद्यावेतन प्रशिक्षणार्थीच्या थेट बँक खात्यात (डिबीटी) ऑनलाईन पद्धतीने दरमहा अदा करण्यात येईल. प्रमुख आस्थापना, उद्योजकांनी अधिसूचित केलेली रिक्तपदे लातूर अर्बन को- ऑप बँक, लातूर (३२ जागा), ट्वेंटी वन शुगर लिमिटेड, मळवटी रोड, लातूर (५० जागा), इंडोमोबिल सेल्स सर्विसेस (महिंद्रा शोरूम) लातूर, (३२ जागा), महाराष्ट्र नागरी सहकरी बँक लातूर (१२ जागा), एम.एस.बिडवे इंजिनिअरिंग महाविद्यालय लातूर (१६ जागा) शेतकरी सहकारी साखर कारखाना किल्लारी ता.औसा, जि.लातूर (१३ जागा) बालाघाट पॉलटेक्नीक रुद्धा, ता. अहमदपूर, जि.लातूर (०३ जागा) .

या योजनेचा लाभ घेण्यासाठी या वेबपोर्टलला भेट देवून योजनेमध्ये सहभागी व्हावे. या वेबपोर्टलवर पूर्वी उमेदवार नोंदणी केलेली असेल, तर उमेदवारांसाठी (उमेदवारांनी आपला रजिस्ट्रेशन क्रमांक व पासवर्ड ने लॉगीन करून आपली प्रोफाईल अपडेट करावी. व इतर तपशीलमध्ये आपली माहिती (उदा. बँकेचे नाव, आयएफएससी कोड, खाते क्रमांक, शाखा कोड, व आपले रहिवासी प्रमाणपत्र, शैक्षणिक पात्रतेचे प्रमाणपत्र, व कॅन्सल चेक अपलोड करावे.), तसेच आपला युजर आयडी व पासवर्डने लॉगीन करून रिक्तपदे निहाय अप्लाय करावे. या योजनेचा जास्तीत-जास्त उमेदवारांनी, लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात येत आले आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, लातूर या कार्यालयाच्या ०२३८२- २९९४६२ दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहनजिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त बा.सु.मरे यांनी केले आहे

## संपादकीय....

# ट्रम्प यांना चपराक

अमेरिकेची परंपरागत धोरणे आमूलाग्र बदलण्याचा आग्रह धरणार्या राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना तेथील सर्वोच्च न्यायालयाने सणसणीत चपराक लगावली. अमेरिकेतर्फे विविध देशांना दिली जाणारी दोन अब्ज डॉलरची परकीय मदत थांबवण्याचा ट्रम्प यांचा आदेश सर्वोच्च न्यायालयाने ५ विरुद्ध ४ मतांनी फेटाळून लावला. जागतिक आरोग्य, कुटुंबकल्याण, शिक्षण वगैरे क्षेत्रांत काम करणार्या स्वयंसेवी संस्थांना अमेरिकन सरकार तसेच यूएस एजन्सी फॉर इंटरनॅशनल डेव्हलपमेंटतर्फे (यूएसएआयडी) मदत केली जाते. यामुळे लाखो लोकांचे जीव वाचतात, तसेच काही प्रमाणात अमेरिकेची प्रतिमाही चांगली होते, असा युक्तिवाद न्यायालयात करण्यात आला होता. अमेरिकेतील अनेक स्वयंसेवी संस्थांनीही या बंदीला आव्हान दिले होते; मात्र यूएसएआयडी ही संस्था कट्टरपंथी लोक चालवतात, अशी टीका ट्रम्प यांनी केली होती. मस्क यांनी तर तिला 'गुन्हेगारी संघटना' संबोधून ती नष्ट केली पाहिजे, असे म्हटले होते. ट्रम्प यांनी सत्तेवर आल्या आल्या बांगला देशला दिली जाणारी मदतही थांबवली. बांगला देशचे हंगामी प्रमुख मोहम्मद युनूस हे अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष जो बायडेन व बिल क्लिंटन यांचे मित्र आहेत, या एकमेव निकषावर ट्रम्प यांनी हा निर्णय घेतला. त्यांनी भारताला दिली जाणारी २.१ कोटी डॉलरची मदतही रोखली. भारत प्रचंड कर आकारून तुफान महसूल गोळा करतो, तेव्हा त्यांच्या मदतीला धावून जायचे काही कारण नाही, असा त्यांचा युक्तिवाद आहे. तीन दशकांपूर्वी ज्या अमेरिकेने जागतिक व्यापार संघटनेच्या (डब्ल्यूटीओ) माध्यमातून जागतिकीकरणाची प्रक्रिया गतिमान केली, तीच अमेरिका आज घड्याळाचे काटे उलटे फिरवू लागली आहे.

ट्रम्प यांनी कॅनडा, मेक्सिको आणि चीनवर आयात शुल्क लागू करण्याची निवडणूक प्रचारातच दिलेली धमकी लगोलग प्रत्यक्षात अमलात आणली. मेक्सिको आणि कॅनडामधील वस्तूंवर कोणत्याही विलंबाविना २५ टक्के आयात शुल्क वसुलीला सुरुवातही झाली. अमेरिकेत मोठ्या प्रमाणावर चीनमधील वस्तूंची आयात केली जाते. फेब्रुवारीमध्ये या मालावर १० टक्के कर लागू करण्यात आला होता. तो आता दुप्पट करण्यात आला. प्रत्युत्तरादाखल चीनने विविध प्रकारच्या अमेरिकी मालावर १५ टक्के आयात शुल्क लावण्याचे जाहीर केले. तसेच जागतिक व्यापार संघटनेत अमेरिकेविरोधात कायदेशीर प्रक्रिया सुरू केली. अमेरिकेच्या या पवित्र्याने दोन्ही देशांतील व्यापारयुद्ध पेटले आहे. ट्रम्प यांनी कारकिर्दीच्या पहिल्या पर्वातही चीनसोबत व्यापार संघर्ष सुरू केला होता. चीननेही अमेरिकेतून आयात केलेले चिकन, गहू, मका आणि कापसावर ज्यादा शुल्क लागू केले, तसेच सोयाबीन, डुकराचे मांस, गोमांस, ज्वारी, फळे, भाज्या, डेअरी उत्पादनांवरही अतिरिक्त १० टक्के आयात शुल्क लावले. कॅनडा आणि मेक्सिकोतून अमेरिकेस येणार्या मालावर २५ टक्के नवे कर लागू करण्यात आले. याचा अर्थ अमेरिकेतील लोकांना गॅस, कार, काचेच्या वस्तू खरेदी करण्यासाठी आता जादा पैसे मोजावे लागतील. खरे तर, अमेरिका, मेक्सिको आणि कॅनडातील करारानुसार, बहुतेक वस्तूंवर कर लागू नाही; पण आता या तिन्ही देशांच्या अर्थव्यवस्थांवर प्रतिकूल परिणाम होणार आहे. कारण, अमेरिकेने करांची करवत चालवल्यामुळे आम्हीही जशास तसे उत्तर देऊ, अशी घोषणा कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रुडो तसेच मेक्सिकोच्या अध्यक्षा क्लॉडिया शिनबाऊ यांनी केल्याने हा आर्थिक वाद आणखी चिघळणार, हे स्पष्ट आहे.

खरे तर, भांडवलशाहीत स्पर्धा निर्माण होते आणि त्यामुळे वस्तूंच्या किमती कमी होऊन ग्राहकांचे कल्याण होते. तसेच उत्पादनवाढ व रोजगाराला चालना मिळते, या अर्थशास्त्रज्ञ अॅडम स्मिथच्या सिद्धांताचा प्रचार अमेरिकेतर्फे केला जात होता. विकसनशील देशांनी आपली बाजारपेठ अमेरिका व पाश्चात्त्य प्रगत राष्ट्रांसाठी खुली करावी, असा दबाव आणला जाऊन जागतिक व्यापार करारावर अनेक गरीब देशांच्या स्वाक्षर्या घेण्यात आल्या; पण आता अमेरिकाच जागतिकीकरणाच्या विरोधात धोरणे राबवत आहे. आता २ एप्रिलपासून भारतावरही आयात शुल्क लागू करणार असल्याची घोषणा ट्रम्प यांनी काँग्रेसमध्ये केलेल्या पहिल्या वार्षिक भाषणात केली आहे. अमेरिकी मालावर भारत १०० टक्के इतके जास्त आयात शुल्क लादतो, अशी तक्रार त्यांनी या भाषणात केली. २०२४ मध्ये अमेरिकेचा भारतासोबत १२९ अब्ज डॉलर इतका व्यापार होता. अमेरिकेची भारतात सुमारे ४१ अब्ज डॉलर इतकी निर्यात असून, भारताची अमेरिकेला केली जाणारी निर्यात ८७ अब्ज डॉलर इतकी आहे. गतवर्षी अमेरिकेची भारतासोबतच्या व्यापारातील तूट ४५ अब्ज डॉलर इतकी होती. जागतिकरणाचे पर्व सुरू झाल्यानंतर उत्पादन क्षेत्रातील अनेक अमेरिकी कंपन्यांनी स्वस्त मानवी श्रम आणि शिथिल कायदे असणार्या देशांत उत्पादन हलवले. अनेक बहुराष्ट्रीय औषध, शीतपेय तसेच इलेक्ट्रॉनिक कंपन्यांनी भारतीय बाजारपेठेत हातपाय पसरून फायदा घेतला. भारतासारखी विशाल बाजारपेठ मिळाली नसती, तर अमेरिकी कंपन्यांच्या मालाला उठाव मिळाला असता का, हा प्रश्न ट्रम्प यांना पडत नाही. आता अमेरिकेच्या 'रेसिप्रोकल टॅरिफ्स'मुळे भारताच्या शेती क्षेत्रास फटका बसू शकतो. अमेरिकेतून येणार्या शेतीमालावर भारताने उच्च कर लावले असून, त्यांचे सरासरी प्रमाण ३९ टक्के इतके आहे. उलट अमेरिकेत भारतातून जो शेतीमाल येतो, त्यावर सरासरी ५ टक्के कर होता. त्यामुळे अमेरिकेने भारतातून येणार्या मालावर प्रतिघाती कर लादल्यास भारताच्या शेतीमाल निर्यातीस फटका बसू शकतो. हे नुकसान कमी व्हावे, या दृष्टिकोनातून भारताने बदाम, अक्रोड, मका यावरील आयात शुल्क कमी केल्यास त्यामुळे भारताचे फारसे नुकसान होणार नाही. या संकटावर मात करण्याचा दुसरा उपाय म्हणजे, भारताने अमेरिकेशिवाय अन्य बाजारपेठांत शिरकाव करून घेण्यासाठी कसोशीचा प्रयत्न करणे. ट्रम्प यांच्या आत्मघातकी धोरणांमुळे अमेरिकेतील महागाई वाढणार आहे. त्याविरोधात तेथील जनतेमधून आवाज उठण्यास सुरुवात झाल्यावर ट्रम्प यांचे डोके ताळ्यावर येऊ शकेल.

# स्थलांतरितांचा हुंकार आणि संघर्ष

जगभरातील बहुतांश देश सध्या निर्वासितांच्या लोंढ्यांचा सामना करत आहेत. युद्ध, संघर्ष, नैसर्गिक आपत्ती, हिंसाचारासारख्या कोणत्या ना कोणत्या कारणाने नागरिकांना घर सोडावे लागून विदेशात, परराज्यांत, परगावात निर्वासितांच्या छावण्यात राहावे लागत आहे. यात वृद्ध, महिला आणि लहान मुलांची स्थिती अतिशय शोचनीय होते. रशिया-युक्रेन संघर्ष, इस्त्रायल-हमास संघर्षामुळे तर निर्वासितांची समस्या ही आणखीच गंभीर झाली आहे.



संघर्ष आणि भूकबळीसारखी स्थिती लोकांना स्थलांतर करण्यास भाग पाडते, तेव्हा जगभरातून त्यांच्याविषयी सहानुभूती व्यक्त करण्यात येते आणि त्यांना या परिस्थितीतून कसे बाहेर काढता येईल, याविषयी चर्चा होते; पण सध्याची स्थिती ही नियंत्रणाबाहेर चालली आहे. जगभरात जबरदस्तीने स्थलांतर कराव्या लागणार्या नागरिकांची संख्या ८ कोटी ४० लाखांपेक्षा अधिक झाली आहे. यापैकी ४ कोटी ८० लाख नागरिक, तर आपापल्या देशातच पाहुणे म्हणून राहत आहेत. एकूण आंतरराष्ट्रीय पातळीवर निर्वासितांची संख्या २७ कोटी २० लाख झाली आहे. यापैकी ९ कोटी ५० लाख नागरिक निम्न आणि मध्यम उत्पन्न गटातील देशांतील आहे. निर्वासित नागरिक स्थलांतर आणि भूकबळीचा एकाचवेळी सामना करत आहेत. हवामान बदल, भूकंप, हिंसाचार, संघर्ष, युद्ध, महागाई, बेरोजगारी, राजकीय स्थिती, दुष्काळ, महापुरामुळे जगभरात निर्वासित होणार्यांची संख्या ११ कोटींपेक्षा अधिक झाली आहे. त्यात ४० टक्के मुले आहेत. प्रामुख्याने ही मुले राष्ट्रीयत्व, शिक्षण, आरोग्य, रोजगार, मुक्त संचारासारख्या स्वातंत्र्याच्या मूलभूत हक्कांपासून वंचित राहत आहेत. स्थलांतराच्या डिसेंबर २०२४ च्या ताज्या अहवालानुसार, गेल्या वर्षात देशांतर्गत स्थलांतर करणार्यांची समस्या ही सर्वाधिक आव्हानात्मक राहिली. यावरून स्थलांतर आणि निर्वासित नागरिकांची भीषण स्थिती कळते. सीरियातील निर्वासित नागरिकांचे आव्हान आता गंभीर संघर्षाचे रूप धारण करत आहे. युक्रेनमध्ये एकूण निर्वासितांची संख्या १ कोटी १३ लाख झाली असून त्यापैकी ५० लाख नागरिक कायमस्वरूपी बेघर झाले आहेत. ६३ लाख नागरिकांनी पोलंड, रुमानिया, स्लोव्हाकिया, हंगेरी आणि बेलारूससारख्या शेजारी देशांत आश्रय घेतला आहे. युक्रेनमध्ये १ कोटीपेक्षा अधिक नागरिक उपासमारीचा सामना करत आहेत. अफगाणिस्तानात एकूण निर्वासित लोकांपैकी बहुसंख्य नागरिकांची अन्न सुरक्षा धोक्यात आली आहे. अफगाणिस्तानात सुमारे १ कोटी ९० लाख नागरिक हे गंभीर रूपाने अन्नटंचाईचा सामना करत आहेत. व्हेनेझुएलातील निर्वासित लोकांपैकी २३ लाख नागरिकांना अन्न अन्न करत भटकंती करावी लागत आहे. निर्वासित जीवनाचा सामना करणारी मुले उपासमार आणि कुपोषणामुळे दगावत आहेत. दक्षिण सुदानमध्ये निर्वासित असणार्या ४५ लाख नागरिकांपैकी २२ लाख जण कायमस्वरूपी निर्वासितांचे जीणे जगत आहेत. म्यानमारचे निर्वासित आणि नागरिकत्वापासून वंचित असलेले १७ लाख नागरिक जगातील सर्वाधिक शोषित, पीडित अल्पसंख्याक म्हणून ओळखले जात आहेत.

युद्ध, शोषण आणि नैसर्गिक संकट यापासून वाचण्यासाठी एका क्षणात आलेली सूचना ही नगारिकांना घर सोडून जाण्यास प्रवृत्त करत आहे. सुमारे नऊ कोटी नागरिकांना त्याक्षणी पळून जाणे संयुक्तिक वाटल्याचे अहवालात म्हटले आहे. यापैकी बहुतांश निर्वासितांना सुरक्षा, अन्न आणि रोजगारासाठी देश सोडावा लागला. सीमेवर तळ ठोकून असलेल्या एकूण निर्वासितांपैकी दोन तृतियांश नागरिक सीरिया, व्हेनेझुएला, अफगाणिस्तान, दक्षिण सुदान, म्यानमारचे आहेत. निर्वासितांचे आयुष्य जगणार्या एक कोटी दहा लाख मुलांवर अनेक दुष्परिणाम पाहावयास मिळत आहेत. पाच वर्षांपेक्षा कमी वयोगटातील लाखो मुले कुपोषणामुळे ठेंगणेपणाचा सामना करत आहेत. जग आजघडीला सर्वाधिक निर्वासितांच्या लोंढ्यांचा सामना करत आहे. दुसर्या महायुद्धापेक्षा ही भयावह स्थिती आहे. सध्या २ कोटी ५० लाखांपेक्षा अधिक नागरिक आपल्या घरावर पाणी सोडून विदेशातील छावण्यांत राहत आहेत. यात १ कोटी १० लाख मुले आहेत. गेल्या १० वर्षांत हा आकडा दुप्पट झाला आहे. गेल्यावर्षी सुमारे १५ कोटी नागरिकांनी उपासमारीचा मुकाबला केला. कोरोनानंतर आतापर्यंत या संख्येत १५ कोटींनी भर पडली आहे. एका अभ्यासानुसार २०३० पर्यंत ही संख्या ६७ कोटींवर जाऊ शकते आणि त्यांना उपासमार सहन करावी लागू शकते.

एका ताज्या अहवालानुसार, २०२३ मध्ये भारतातील सुमारे पाच लाख नागरिक निर्वासित झाले आहेत. देशांतर्गत निर्वासित देखरेख केंद्राच्या (आयडीएमसी) माहितीनुसार २०२२ अखेरपर्यंत सात लाख नागरिक निर्वासित झाले होते. यापैकी बहुतांश ईशान्य आसाम, मिझोराम, जम्मू-काश्मीर, मेघालय अणि त्रिपुरातील आहेत. जगातील एकूण निर्वासितांपैकी २० टक्के भारतातील आहेत. 'डाऊन टू अर्थ स्टेट ऑफ इंडियाज एन्व्हायर्न्मेंट'च्या अहवालानुसार संघर्ष आणि हिंसाचारामुळे सुमारे ८५ लाख नागरिक बेघर झाले आहेत. भारतात निर्वासित होण्याच्या कारणांची स्थिती वेगळी आहे आणि त्यामुळे त्यावर देखरेख ठेवणे कठीण जाते. राज्य पातळीवर निर्वासितांचे आकलन करायचे झाल्यास राजकीय इच्छाशक्तीचा अभाव दिसून येतो. त्यामुळे त्याचा डेटा जारी करण्यापासून कधी कधी थांबवण्यात येते; पण ढोबाळमानाने देशांतर्गत निर्वासितांची संख्या पाच लाखांपेक्षा अधिक असल्याचे सांगितले जात आहे. दिल्लीतील भारतीय सामाजिक संस्थांच्या मते, ही संख्या २ कोटी १३ लाख आहे. निर्वासितांची समस्या ही विकासकामांवर परिणाम करते. एका अहवालानुसार महापूर, चक्रीवादळ, भूस्खलनामुळे भारतात सातत्याने निर्वासितांचा अनुभव आला आहे.

# जागतिक महिला दिनाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा !

८ मार्च जागतिक महिला दिन सर्वत्र मोठ्या उत्साहात संपन्न होत आहे. स्त्री हीच सर्व जगाची जननी आहे, जिच्या हाती शिक्षणाची दोरी ती जगाचा उद्धार करी, प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या मागे एका स्त्रीचा हात असतो. अशा प्रकारे कथा, चित्रपट, नाटिका, लेखन साहित्य, कविता इत्यादी च्या माध्यमातून स्त्रीची महिमा सांगितली जाते, आणि गायली जाते. कोणत्याही समाजाची प्रगती ही त्या समाजातील महिलांच्या प्रगतीवरून ठरते, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटले आहे. बाबासाहेबांनी भारतीय समाजात महिलांच्या हक्कांसाठी लढा दिला आणि त्यांच्या सन्मानासाठी महत्त्वपूर्ण कायदे प्रस्तावित केले. बाबासाहेब सामाजिक न्यायाचे प्रणेते होते. त्यांनी महिलांना पुरुषांच्या बरोबरीने अधिकार मिळावेत, शिक्षण आणि रोजगाराच्या संधी मिळाव्यात यासाठी मोठे प्रयत्न केले. आज महिलांना वडिलांच्या संपत्तीतून जो हिस्सा (वाटा) मिळतो ना तो बाबासाहेबांच्या महान कार्यामुळेच नाहीतर भारतीय समाज व्यवस्थेने पुरुष प्रधान संस्कृती स्वीकारली असून महिलांना अत्यंत दुय्यम स्थान दिलेले आहे असे आपण पाहतोच. मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९४८ मध्ये हिंदू कोड बिल सादर केले, जे भारतातील हिंदू महिलांसाठी क्रांतिकारी ठरले. या विधेयकामुळे महिलांना विवाह आणि घटस्फोटाचे कायदेशीर अधिकार मिळाले. संपत्तीतील समान अधिकार मिळाले. विधवा स्त्रियांना पुनर्विवाह करण्याचा हक्क मिळाला. हिंदू कोड बिलाला तत्कालीन सरकारने विरोध केल्यावर बाबासाहेबांनी आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला. कदाचित जगाच्या पाठीवर आपल्या देशातील महिलांच्या न्यायकासाठी आपल्या केंद्रीय मंत्री पदाचा राजीनामा देणारे एकमेव महान महापुरुष म्हणजे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरच असतील या बद्दल दुमत नाही.नंतरच्या काळात हेच हिंदू कोड बिल चार वेगवेगळ्या कायद्यांच्या स्वरूपात मंजूर झाले. आज भारतीय महिलांना समानतेचा दर्जा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे, त्यात बाबासाहेबांचे फार मोठे योगदान आहे. महिला दिन हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा सन्मान करण्याचा आणि महिलांच्या हक्कांसाठी त्यांच्या संघर्षाची आठवण करण्याचा दिवस आहे. एवढे महान कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तमाम भारतीय स्त्रियांसाठी करून ठेवले असताना सुद्धा आजच्या विज्ञान युगातील काही अपवाद वगळता अनेक महिला मात्र बाबासाहेबांच्या या महान उपकाराला आणि कार्याला विसरत चालले आहे. महिला दिनाच्या निमित्ताने छत्रपती शिवाजी महाराज ,क्रांतिसूर्य महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून आत्मनिर्भर होण्याच्या दिशेने वाटचाल करण्याचा किमान सुशिक्षित महिलांनी तरी निर्धार केला पाहिजे. आणि ज्या ज्या स्त्रीने आपल्या कुटुंबासाठी समाजासाठी राष्ट्रासाठी केलेल्या महान कार्याला आज नमन करून सर्व माता बहिणी मैत्रिणी गृहिणी यांना महिला दिनाच्या मनपूर्वक हार्दिक शुभेच्छा देतो.

*******

लेखक- सिद्धार्थ तायडे
मु. पो. वडनेर भोलजी
ता. नांदुरा
जि.बुलढाणा
मो.न.९३०९७६७३८८


# गांधी आजही का हवे आहेत?

गेल्या काही वर्षात धार्मिक द्वेषाचे वातावरण सर्वदूर निर्माण करण्यात आले आहे. तसेच जातींच्या तीव्र अस्मिता राजकरणा पलिकडे समाजातील सर्व स्तरांवर हानी पोचवताना दिसत आहे. त्याचबरोबर महात्मा गांधींच्या बदनामीची मोहीम धडाक्यात सुरू आहे. पुस्तके, समाजमाध्यमांचे जाळे इत्यादी मार्गाने गांधीजीची हेटाळणी करणे, शिव्या देणे हे प्रकार सुरू आहेत. या सर्व पार्श्वभूमीवर गांधींचे विचार पुन्हा एकदा ऐरणीवर आणावेत असे तीव्रतेने वाटते.

दक्षिण अफ्रिकेत गेलेल्या महात्मा गांधींनी १८९३ ते १९१५ या काळात अफ्रिकेतील भारतीय आणि गोरेतर लोकांच्या अधिकारासाठी दिलेल्या लढ्याने सर्व जगाचे लक्ष वेधून घेतले. पोटापाण्यासाठी गेलेल्या बॅ. गांधींना रेल्वेच्या पहिल्या दर्जाच्या डब्यातून, ते गोरेतर असल्याच्या कारणावरून खाली ढकलून देण्यात आले. त्यांच्यावर झालेला हा अन्याय वैयक्तिक न्हवता, तो प्रातिनिधिक होता. तसेच भारतीयांना वर्क परमिटसाठी बोटांचे ठसे द्यावे लागणे, वार्षिक तीन पौंड कर द्यावा लागणे, इ. अन्यायाविरोधात गांधीजींनी आवाज उठवला. भारतीय पद्धतीने झालेले विवाह बेकायदेशीर ठरवल्याचा अफ्रिकेच्या सरकारचा निर्णयाविरोधात गांधींनी यशस्वी लढा दिला. या भूमीवरच बॅरिस्टर मोहनदास करमचंद गांधीचे रूपांतर महात्मा गांधींमध्ये झाले. भारतीयांच्या अधिकारासाठी दिलेला लढा, अहिंसक मार्गाने होता. त्यात सरकारशी संवाद, ब्रिटिश पार्लमेंटमध्ये आपली बाजू मांडणे, कायदेशीर लढाई करणे याबरोबरच एक नवीन प्रणाली त्यांनी जगासमोर ठेवली. 'सत्याग्रह' हा शब्द आणि हे शास्त्र दक्षिण आफ्रिकेत महात्मा गांधींच्या लढ्यातले एक महत्वाचे शस्त्र होते. कोणताही अन्याय सहन करायचा नाही; त्या विरोधात लढा दयायचा पण त्यात हिंसा करायची नाही, रस्त्यावर येऊन आपली मागणी मांडायची ही पद्धत या शास्त्रात महत्वाची होती. सर्वसामान्य लोकांचा सहभाग ही त्यातली ताकद होती, तर प्रतिपक्षाशी संवाद साधून त्यांना आपली बाजू पटवून देणे यावर त्यांचा दृढ विश्वास होता.

१९१५ साली गांधी भारतात आल्यानंतर चंपारण येथील शेतकऱ्यांचा लढा यशस्वीपणे पार पाडला. लोकमान्य टिळकांच्या निधनानंतर काँग्रेसचे आणि स्वातंत्र्य लढ्याचे नेतृत्व म. गांधींनी केले. हा काळ भारताच्या इतिहासात अतिशय महत्वाचा होता. देशभर चैतन्य संचारले होते. इंग्रजाच्या विरोधात शांततामय मार्गाने लढणाऱ्या भारतीय जनतेचे आधुनिक राष्ट्र कसे असावे या विषयी देखील मोठया प्रमाणात चिंतन होत होते. महात्मा गांधींच्या अस्पृश्यता निवारणापासून सुरू झालेला विचार जाती अंताच्या निर्धारापर्यंत पोचला होता.

आंदोलनात सहभागी झालेल्या स्त्रिया समाजाला नवीन दिशा देण्यासाठी योगदान देत होत्या. महात्मा फुले, राजाराम मोहन रॉय, आगरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इ. नेते आणि विचारवंत समाज प्रबोधनाची आघाडी सांभाळत होते. जात, वंश व लिंगावर आधारित विषमता नाकारण्यासाठी मानसिकता घडविण्याचा सर्वदूर प्रयत्न होत होता. विविध धर्मातील लोकांना इंग्रजी शासनाविरोधातील लढ्यात एकत्र गुंफण्यात महात्मा गांधींना यश आले होते. गांधींचे जीवन व गांधींचे नेतृत्व सर्वधर्मीयांना आकर्षित करत होते. गांधीच्या आश्रमात कर्मकांड नव्हते, उलट सर्वधर्म प्रार्थना होत असे.



संकुचित व अस्मितेचे राजकारण करू पाहणाऱ्यांना हे पटत नव्हते. पण त्यांना समाजमान्यता नव्हती, सर्वसामान्य जनता गांधी आणि काँग्रेसबरोबर राहिली. महात्मा गांधी आणि काँग्रेसच्या नेत्यांच्या प्रयत्नांना यश येता येता देशाची फाळणी झाली, भारत आणि पाकिस्तानच्या सीमावर्ती भागात मोठ्या प्रमाणात हिंसाचार झाला, लाखो निरपराध माणसे मारली गेली. धार्मिक द्वेषाच्या विषारी वातावरणात महात्मा गांधींची हत्या झाली. हिंदुत्ववादी शक्तींनी रचलेला हत्येचा कट यशस्वी झाला. महात्मा गांधींची हत्या हा भारतीय जनतेसाठी फार मोठा धक्का होता. देशातले पूर्ण वातावरण बदलले. सर्वसामान्य जनतेमध्ये गांधींच्या हत्येविषयी नाराजी होती, राग होता. गांधींची हत्या करणाऱ्याचे नाव लगेच कळाले म्हणून मोठा अनर्थ टळला. नथुराम गोडसेने हत्या करताना दाढी वाढवली होती आणि सुंता करून घेतली होती. त्याचे नाव कळेपर्यंत काही काळ गेला.

त्यावेळी काही ठिकाणी मुस्लिमांच्या घरांवर हल्ले झाले. मात्र नंतर नथुराम गोडसे हे नाव कळाल्यावर कोल्हापूर, सांगली, सातारा, पुणे या परिसरामध्ये काही ब्राह्मणांच्या घरांवर हल्ले करण्यात आले, आगी लावण्यात आल्या. तो हिंसाचारही थांबला. पण देशभरात शोककळा पसरली होती.

भारतीय स्वातंत्र्य लढा आणि महात्मा गांधी यांची जीवनशैली, नेतृत्व जगभरातल्या विचारवंतांना आकर्षित करत होते. जगातल्या अनेक भागात गांधींवर लिखाण झाले. भारताच्या विविध भाषिक साहित्यात गांधींच्या विचारांचा प्रभाव दिसतो. मराठी साहित्यात मात्र गांधींची दखल पुरेशा प्रमाणात घेतली गेली नाही. किंबहुना, त्यांच्या विरोधातील लिखाणच जास्त दिसते. तथापि, जुन्या प्रस्थापित साहित्यिकांत वि.स. खांडेकर यांच्या लिखाणात गांधी व स्वातंत्र्य आंदोलनाचा प्रभाव जाणवतो. साने गुरूजी आणि पु.ल देशपांडे यांनी गांधींविषयी लिखाण केले आहे. बाकी फारशी नावे डोळयांसमोर येत नाहीत. अलीकडच्या काळात न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी, सुरेश द्वादशीवार, चंद्रकांत वानखेडे, चंद्रकांत झटाले, न्या. नरेंद्र चपळगांवकर, निशा शिऊरकर यांची गांधींविषयीची पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

गांधींवरच्या काही चांगल्या पुस्तकांचा मराठीत अनुवाद प्रकाशित झाला आहे. त्यात गिरीराज किशोर यांच्या 'पहिला गिरमिटिया' आणि 'बा' या दोन कांदबऱ्या आहेत. लुई फिशर यांच्या गांधींवरच्या पुस्तकाचा अनुवाद साधनातर्फे प्रकाशित करण्यात आला आहे. 'लेट अस किल गांधी' आणि 'कस्तुरबा यांची डायरी' ही तुषार गांधी यांची दोन पुस्तके मराठीत आली आहेत.

आज महाराष्ट्रात परभणी व बीड जिल्हयात हिंसाचार आणि जातींच्या अस्मितेतून निर्माण झालेले विषारी वातावरण चिंता निर्माण करणारे आहे. विशाळगड, त्र्यंबकेश्वर, मढी व इतर अनेक ठिकाणी मुस्लिमांवर होणारे जीवघेणे व आर्थिक हल्ले वाढत आहेत. ख्रिश्चनांच्या चर्च आणि शाळा यांना लक्ष्य करण्यात येत आहे. या सर्वांचे समर्थन करणारा एक मध्यमवर्गीय गट समाजमाध्यमात आक्रमकतेने कार्यरत आहे. हे सर्व चिंता निर्माण करणारे आहे.

समतेवर आधारित संविधानाच्या मार्गदर्शनाने सर्वसमावेशक समाज व आधुनिक भारत निर्माण करण्याच्या दिशेने आपला प्रवास व्हायला हवा. आज नेमके उलटे होताना दिसत आहे. महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि जवाहरलाल नेहरू यांच्या विचारांच्या आधारानेच आपल्याला पुढची वाटचाल करावी लागेल. 'गांधी विचार साहित्य संमेलन' हा त्यासाठी केलेल्या प्रयत्नातला एक छोटा भाग होय.

# धारुर रोड ते माधवबाग, माधव नगर या भागातील सिमेंट रस्ता व नाली बांधकामाचे भूमिपूजन संपन्न

केज/प्रतिनिधी केज शहरातील धारूर रोड ते माधवबाग, माधव नगर भागातील सिमेंट रस्त्याचे व नालीचे बांधकामाचे भूमिपूजन नगराध्यक्षा सौ.सिताताई बनसोड, व जनविकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख हारुणभाई इनामदार, ज्येष्ठ नेते सुरेश तात्या पाटील व या भागातील रहिवासी नागरिक यांच्या हस्ते संपन्न झाले. मागील पंधरा-वीस वर्षापासून धारूर रोड ते माधवबाग, माधव नगर याभागात रस्ता व नालीचे बांधकाम झालेले नव्हते, येथील नागरिक खूप त्रस्त झाले होते. परंतु हारुणभाई इनामदार व नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांनी पाठपुरावा करून या भागातील सिमेंट रस्ते व नालीच्या बांधकामासाठी बजेट मंजूर करून आणले या भागात सदर काम करण्यासाठी वेळोवेळी जेष्ठ नेते सुरेश तात्या पाटील यांच्यासोबत नगराध्यक्षा सीताताई बनसोड व जनविकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख हारूणभाई यांनी चर्चा करून या भागातील विकास कामासाठी जागा देण्यासाठी विनंती केली सदर विनंतीला सुरेश तात्या पाटील यांनी पाठिंबा देऊन स्वतः पुढाकार घेतला त्यामुळे नगराध्यक्षा सौ.सीताताई व हारुणभाई इनामदार यांनी सुरेश तात्या पाटील यांचे आभार मानले.



नाल्यांचे पाणी बाहेर काढण्यासाठी जागा उपलब्ध होत नव्हती परंतु केज जेष्ठ नागरिक सुरेश तात्या पाटील यांनी आपल्या शेतातुन नालीचे बांधकाम करण्यासाठी परवानगी दिली यामुळे या भागातील लोकांना मोठा दिलासा मिळाला आहे.सुरेश तात्या पाटील यांच्या दानसुरपनाचा मोठेपणा यातुन दिसुन येतो. सदर ठिकाणी लोक एक दोन फूट आपल्या जागेत येऊ देत नाहीत अशा ठिकाणी सुरेश तात्या पाटील यांनी आपल्या शेतालगत नाली बांधकाम करण्यातसाठी जागा देऊन एक आदर्श निर्माण केला आहे.

यावेळी सुरेश तात्या पाटील यांनी बोलताना सांगितले की,आम्ही सदैव विकासाच्या बाजुने आहोत.तुम्ही आमच्या गल्लीतल्या जनतेच्या जिव्हाळ्याचा प्रश्न मार्गी लावल्यामुळे हि जनता तुम्हाला जात पात बाजूला ठेवून कदापि विसरणार नाही असे स्पष्ट मत व्यक्त केले. पुढे बोलताना सुरेश तात्या पाटील म्हणाले की, मागील तीन वर्षांमध्ये जनविकास परिवर्तन आघाडीच्या व केज नगरपंचायतच्या माध्यमातून केज शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात विविध विकास कामे झालेली आहेत आता केजचा चेहरा मोहरा बदललेला आहे याचे श्रेय हे हारुणभाई इनामदार व नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड यांचे आहे.हारुणभाई इनामदार यांच्या मुळेच केज शहराचा खरा विकास झाला आहे हारुणभाई हे खरे विकास पुरुष आहेत असे सुरेश तात्या पाटील यांनी म्हटले आहे. यावेळी हारुणभाई इनामदार यांनी आपल्या भाषणात सांगितले की, केज शहरासह या भागातील राहीलेल्या गल्लीतील रस्त्याचे व नाली बांधकामाचे काम लवकरच मार्गी लावुत असे आश्वासन दिले. केज शहराचा विकास करण्यासाठी आम्ही अहोरात्र प्रयत्नशील आहोत प्रत्येक लोकप्रतिनिधी यांची मदत घेत आहोत व ते आम्हाला सरळ हाताने मदत करत आहेत.

आम्ही आमचे नेते हारुणभाई इनामदार यांच्या नेतृत्वाखाली व वरिष्ठाच्या आदेशाने सर्व नगरसेवकांना सोबत घेऊन काम करत आहोत. केज शहरात विविध विकास कामे करत असताना आम्हाला जनतेचा भरभरून प्रतिसाद मिळत आहे या प्रतिसादाच्या जोरावर आम्ही विविध विकास कामे शहराच्या प्रगतीसाठी आणत आहोत. यावेळी या भागातील नागरिक व जनविकास परिवर्तन आघाडीचे पदाधिकारी उपस्थित होते. या भागातील सिमेंट रस्त्याचे व नालीच्या बांधकाम चालू केल्याबद्दल ज्येष्ठ नेते सुरेश तात्या पाटील, हारुणभाई इनामदार,सीताताई बनसोड यांच्यासह उपस्थित पत्रकार बांधवांचा या भागातील नागरिकांच्या वतीने शाल,श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला व त्यांचे आभार व्यक्त करण्यात आले.

# पंचायत समिती कार्यालयात जागतिक महिला दिनानिमित्त तालुकास्तरीय महिला सभा संपन्न

केज/प्रतिनिधी केज पंचायत समिती कार्यालयात जागतिक महिला दिनानिमित्त तालुकास्तरीय महिला सभा संपन्न झाली आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी स. प्र.अ.पं.स. केजच्या श्रीमती सविता शेप तर प्रमुख पाहुणे म्हणून सहाय्यक गट विकास अधिकारी अभिमान राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्वप्रथम उपस्थित मान्यवरांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, माँ जिजाऊ साहेब, माता रमाई यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून धूप-दिपानी पूजन करून वंदन करण्यात आले. यावेळी शिक्षण विभाग,पशुधन विभाग,ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग,आरोग्य विभाग, एकात्मिक बाल विकास विभाग, उमेद विभाग यासह पंचायत समिती कार्यालयातील कर्तत्ववान महिला कर्मचारी यांच्यासह विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान करून मोठ्या उत्साहामध्ये महिला सभा घेण्यात आली. यावेळी सर्व विभागाच्या प्रमुखांनी उपस्थितांना महिला दिनानिमित्त मोलाचे मार्गदर्शन करून महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी सहाय्यक गटविकास अधिकारी अभिमान राठोड यांनी माँ जिजाऊ, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, माता रमाई यांच्या आठवणींना उजाळा देत म्हणाले की, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले या स्वतः शिक्षण घेण्यासाठी दगड गोटे खाऊन त्यांनी शिक्षण घेऊन एक आदर्श शिक्षिका बनल्या आज सर्व महिलांनी त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवणे ही काळाची गरज आहे असे बोलताना त्यांनी पष्ट केले आहे पुढे बोलताना राठोड यांनी उपस्थितांना महिला दिनाचे महत्त्व समजून सांगितले व महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या. अध्यक्षीय समारोपप्रसंगी श्रीमती सविता शेप मॅडम म्हणाले की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी राज्यघटनेच्या माध्यमातून आपल्याला जगण्याचे अधिकार दिले या अधिकारामुळेच आपण आज या खुर्ची पर्यंत पोहोचलो आहोत. जर महिलांना महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घटनेच्या माध्यमातून अधिकार दिले नसते तर आज आपण चूल आणि मूल यामध्येच राहिलो असतो असे बोलताना त्यांनी स्पष्ट केले यावेळी त्यांनी महिला दिनानिमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्या. यावेळी अजित ढोकर, शेख, ढाकणे, मुंडकर, देशमाने, देशमुख, लोंढे यांच्यासह पंचायत समिती कार्यालयातील कर्मचारी व ग्रामीण भागातील महिलांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पंचायत विभागाचे विस्तार अधिकारी अनिल चौरे यांनी केले तर उपस्थितांचे आभार ढाकणे यांनी मानले. शेवटी या कार्यक्रमाचा समारोप हा अल्पोपहाराने झाला.




# रस्त्यावर झोपलेल्या भिकाऱ्याला पेट्रोल टाकून जाळण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला २४ तासाच्या आत अटक. औसा पोलिसाची कारवाई.

औसा :- रस्त्यावर झोपलेल्या भिकाऱ्याला पेट्रोल टाकून जाळण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला २४ तासाच्या आत अटक. औसा पोलिसाची कारवाई.

याबाबत अधिक माहिती अशी की, दिनांक ४ मार्च २०२५ च्या मध्यरात्री एका अज्ञात आरोपीकडून औसा शहरातील एका दुकानासमोर झोपलेल्या भिकाऱ्याच्या अंगावर पेट्रोल टाकून त्याला जिवंत जाळण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. सदर घटनेमध्ये सदरचा भिकारी जळून गंभीर जखमी झाला होता. त्याच्यावर औसा व त्यानंतर लातूर येथील रुग्णालयात उपचार चालू असताना त्याने दिलेल्या फिर्यादीवरून ०५ मार्च रोजी पोलीस ठाणे औसा येथे दिनांक गुन्हा दाखल करण्यात आला होता.



पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी, औसा कुमार चौधरी यांचे मार्गदर्शनात पोलीस ठाणे औसा चे पोलीस निरीक्षक सुनील रेजीतवाड यांच्या नेतृत्वात सहाय्यक पोलीस निरीक्षक बाळासाहेब नरवटे यांचे पथकाने गुन्ह्याचा अतिशय बारकाईने तपास करून गोपनीय माहिती मिळवून रस्त्यावर दुकानासमोर झोपलेल्या भिकाऱ्याच्या अंगावर पेट्रोल टाकून जिवंत जाळणार्या आरोपीला निष्पन्न केले असून त्याचे नाव योगेशसिद्रामबुट्टे, वय३५वर्ष, राहणारअन्नपूर्णानगर, औसा. असे असून त्यास दिनांक ७ मार्च २०२५ रोजी त्याचे राहते ठिकाणाहून अटक करण्यात आली आहे.

भिकाऱ्याने आरोपीला शिवी दिल्याचा राग मनामध्ये धरून रात्री रोडवर झोपलेल्या भिकाऱ्याला पेट्रोल टाकून जिवंत जाळण्याचा प्रयत्न केला असल्याचे कबूल केले आहे.

वरिष्ठांच्या मार्गदर्शनात औसा पोलिसांनी अतिशय कुशलतेने गुन्ह्याच्या तपास करून अज्ञात आरोपीला २४ तासाच्या आत निष्पन्न करून गुन्ह्यात अटक केली आहे.

सदरची कामगिरी वरिष्ठांचे व पोलीस निरीक्षक सुनील रेजीतवाड यांच्या मार्गदर्शनात पोलीस ठाणे औसा चे सहाय्यक पोलीस निरीक्षक बाळासाहेब नरवटे, सहाय्यक पोलीस निरीक्षक महावीर जाधव, सहाय्यक फौजदार कांबळे, पोलीस अंमलदार गुट्टे, रतन शेख, समीर शेख, मुबाज सय्यद, बालाजी चव्हाण, पडीले,गोमारे यांनी केली आहे.

# राजर्षी शाहू विद्या मंदिर शाळेत महिला दिन साजरा

केज/प्रतिनिधी केज शहरातील स्वामी दयानंद प्रतिष्ठानच्या राजर्षी शाहू विद्या मंदिर केज शाळेत शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती चाटे बी. बी.यांच्या अध्यक्षतेखाली जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सर्वप्रथम सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.उपस्थित मुख्याध्यापिका,सर्व शिक्षिका व महिला कर्मचारी यांचा पुषगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी मंचावर शाळेतील शिक्षिका श्रीमती अनिता जाधव, श्रीमती ध्वजा गायकवाड व ज्येष्ठ शिक्षक यादव व्ही.बी.यांची उपस्थिती होती. शाळेतील सर्व शिक्षकांनी जागतिक महिला दिन हा जगभरातील महिलांच्या ताकदीचा, संघर्षाचा सन्मान करण्यासाठी साजरा करतात.महिला या केवळ परिवाराचा आधार नाहीत तर परिवारासोबतच समाजाचा आणि देशाचा आधारस्तंभ आहेत. महिलांनी त्यांच्या जिद्दीच्या जोरावर प्रत्येक क्षेत्रात आपले स्थान निर्माण केले आहे अशा आशयाचे मनोगत व्यक्त केले व महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमाचे संचलन क्षीरसागर आर.एस.तर आभार देशमुख ए.डी.यांनी मानले कार्यक्रम यशस्वीतेसाठी डिरंगे जी. बी.व मस्के जे.आर. यांनी मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रम प्रसंगी सर्व विद्यार्थी उपस्थित होते.



# उद्योजकांसाठी पोषक वातावरण निर्मिती करून मराठवाडा सुजलाम सुफलाम करण्यासाठी सर्व मिळून प्रयत्न करूया

छत्रपती संभाजीनगर,दि.८, (विमाका) :- उद्योगांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रशासन आपल्या सोबत आहे, रस्ते, वाहतूक, पार्किंग प्रश्न, पाणी, वीज, उद्योग सुरक्षा सोडविण्यासह आवश्यक त्या पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासन कटिबद्ध आहे. उद्योजकांसाठी पोषक वातावरण निर्मिती करून मराठवाडा सुजलाम सुफलाम करण्यासाठी सर्व मिळून प्रयत्न करूया, असे प्रतिपादन विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी आज केले. छत्रपती संभाजीनगर विभागातील गुंतवणूकदार, उद्योजक, शासनाच्या विविध प्रकल्पांना येणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्याच्या अनुषंगाने छत्रपती संभाजीनगर विभागातील आठही जिल्ह्याचे जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक तसेच उद्योग विभागाशी संबंधित असलेल्या विभागाचे विभाग प्रमुख, उद्योजक तसेच उद्योजक प्रतिनिधी यांची बैठक ऑरिक सीटी शेंद्रा येथे विभागीय आयुक्त श्री. गावडे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक विरेंद्र मिश्र, छत्रपती संभाजीनगरचे पोलीस आयुक्त प्रविण पवार, विभागातील आठही जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी तसेच पोलीस अधीक्षक उपस्थित होते. बैठकीत संवाद साधताना श्री. गावडे म्हणाले, उद्योजक, गुंतवणूकदार यांच्या अडचणी दूर करण्यासाठी जिल्हास्तरावर बैठका घेण्यात याव्यात तसेच गुंतवणूकदार उद्योजकांना येणाऱ्या अडचणीचे निराकरण तसेच कायदा व सुव्यवस्था या बाबींची प्रभावीपणे हाताळणी करा, असे निर्देश त्यांनी यंत्रणेला दिले. राज्यस्तर व केंद्रीय स्तरावरील विषय निवेदनाद्वारे राज्यस्तरीय समितीला देऊन आवश्यक ते बदल करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येतील. उद्योजक संघटनांशी चर्चा करुन त्यांना येणाऱ्या अडचणींचे तातडीने निराकरण संबंधित विभागाकडून तत्परतेने करण्यात येईल, असा विश्वास देत विभागीय आयुक्त श्री. गावडे यांनी गुंतवणूकदारांच्या अडचणी समजून घेत अडचणी सोडविण्यासाठी संबंधित विभागाला सूचना दिल्या. प्रारंभी जागतिक महिला दिनानिमित्त उपस्थित असलेल्या लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जालन्याच्या प्रभारी जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार तसेच पोलीस उपअधीक्षक पुजा नानगरे यांचा प्रातिनिधीक स्वरूपात सत्कार करण्यात आला. धाराशिवचे पोलीस अधीक्षक संजय जाधव यांनी संगणकीय सादरीकरणाद्वारे प्रशासनाची भूमिका विशद केली. बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी उद्योजकांनी आणि प्रशासनाने करावयाच्या आठ सूत्री कार्यक्रमाबाबत माहिती दिली. तसेच या अनुषंगाने प्रशासकीय पातळीवर सर्वच अधिकाऱ्यांनी उद्योजकांना सर्वोतोपरी मदत करण्याबाबत आवाहन केले. छत्रपती संभाजीनगर, जालना, लातूर, धाराशिव, हिंगोली आणि नांदेड जिल्हाधिकारी तसेच पोलीस अधीक्षक यांनीही चर्चेत सहभाग घेऊन प्रशासनाची भूमिका विशद केली. प्रकल्पातील सामानाची चोरी, रस्ता अडविणे, बेकायदेशीर बाबींची मागणी करणे इत्यादी बाबत तात्काळ तक्रार करावी. संबंधितांवर कायदेशीर कारवाई करणे सोपे होते. उशिराने तक्रार केल्यास गुन्हेगारास पकडण्यास विलंब होतो, उद्योजकांनी त्यांच्या औद्योगिक परिसरात सुरक्षा कुंपन करणे, सीसीटीव्ही कॅमेरे लावणे, खाजगी सुरक्षा रक्षकांची नेमणूक करणे, खाजगी पेट्रोलिंगची व्यवस्था याबाबत उद्योजकांशी चर्चा केली. औद्योगिक क्षेत्राचे सुरक्षा ऑडिट करणार असे विशेष पोलीस महानिरीक्षक विरेंद्र मिश्र यांनी सांगितले. उद्योकांना आवश्यक असलेल्या चांगल्या वातावरणासाठी पोलीस विभागाचे पोलीस विभागाचे सर्वोतोपरी प्रयत्न राहील असे पोलीस आयुक्त प्रविण पवार यांनी सांगितले. वाळुज इंडस्ट्रिज असोसिएशन, मराठवाडा चेंबर ऑफ कॉमर्स ण्ड इंडस्ट्री, मसिआ, सिमिया, सीआयआय, डब्लुआयए, लघुउद्योग भारती, देवगिरी इलेक्ट्रानिक क्लस्टर, मराठवाडा ऑटो क्लस्टर, मॅजिक, तसेच आठही जिल्ह्यातील विविध असोसिएशनचे पदाधिकारी तसेच विविध औद्योगिक संघटनांचे प्रतिनिधी बैठकीस उपस्थित होते.

प्रास्ताविक अपर आयुक्त के.आर.परदेशी यांनी केले. आजच्या उद्योजक बैठकीचा उद्देश त्यांनी सांगितला. आभार परभणीचे जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी मानले.



# जागतिक महिला दिनानिमित्त महापूर येथील सर्वरोग तपासणी व उपचार शिबिराला महिलांचा उस्फुर्त प्रतिसाद

लातूर / प्रतिनीधी :- जागतिक महिला दिनानिमित्त विलासराव देशमुख फाऊंडेशनच्या पुढाकारातून व विलासराव देशमुख वैद्यकीय शासकीय महाविद्यालय यांच्या सहकार्यातून लातूर तालुक्यातील महापूर येथे शनिवार दि. ८ मार्च रोजी आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जनआरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना अंतर्गत सर्वरोग तपासणी व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले. या सर्वरोग तपासणी व उपचार शिबिराला महिलांचा उस्फुर्त प्रतिसाद मिळाला. महापूर येथे ट्वेंटीवन ग्रीच्या संचालिका सौ. अदिती अमित देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली विलासराव देशमुख फाऊंडेशनच्या पुढाकारातून सर्वरोग तपासणी व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात महिला डॉक्टरांद्वारे महिलांची स्तन विकाराची आयब्रेस्ट स्कॅन मशीनद्वारे मोफत तपासणी करण्यात आली तसेच १८२ महिलांची आरोग्य तपासणी करून त्यांना औषध गोळ्यांचे वाटप करून महिलांना त्यांच्या आरोग्याबद्दल जागरूक करण्यात आले आणि त्यांना मोफत तपासणी आणि उपचारांची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. मेघराज चावडा (अध्यक्ष आणि वैद्यकीय समन्वयक) संगीता मोळवणे (संस्थेच्या समन्वयक), डॉ. पूनम राठोड (वैद्यकीय अधिकारी), सई गोरे (अध्यक्ष, दिव्यतेज प्रतिष्ठान), हेमंत लोहारे (शिबीर समन्वयक), डॉ.अनंत सूर्यवंशी (ग्रामविकास अधिकारी), गावचे सरपंच माने, मु.अ. बी.के. भोसले, डी.आर. पवार, संदीप माने, आरोग्य उपकेंद्र महापूरचे कर्मचारी, गजानन बोयणे आणि अन्य कार्यकर्ते, अंगणवाडी मदतनीस, उमेद बचत गटाचे सदस्य यांनी प्रयन्त केले.






# कैलास बोराडे यांच्यावर अन्याय करणाऱ्या आरोपींना तात्काळ कारवाई करण्यात यावी- धनगर समाज बांधवांनी केली मागणी

केज/प्रतिनिधी जालना जिल्ह्यातील कैलास बोराडे यांच्यावर अन्याय करणाऱ्या आरोपींना तात्काळ कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे केज येथील धनगर समाज बांधवांनी तहसीलदार केज यांच्याकडे केली आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, जालना जिल्ह्यातील भोकरदन तालुक्यातील कैलास बोराडे या धनगर समाजाच्या युवकावर गावातील काही गावगुंडाने सळई लालबुंद गरम करून त्या सळईने चटके देऊन अमानुषपणे मारहाण केली आहे. त्या लालबुंद गरम केलेल्या सळीने पीडित युवकांच्या अंगावर चटके दिले. सदर घटनेतील आरोपीवर तात्काळ कठोर कारवाई करण्यात यावी. धनगर समाजावर अनेक वेळा आमाणूस पणे हल्ले होत आहेत. मेंढपाळांना अनेक ठिकाणी हाणमार होत आहे त्यामुळे धनगर समाजाच्या संरक्षणासाठी ट्रॉसिटी कायदा लागू करण्यात यावा. असे तहसीलदार यांना दिलेल्या लेखी निवेदनात म्हटले आहे. या लेखी निवेदनावर ड.ए.व्ही धायगुडे, बाळासाहेब गाढवे, शिवाजी चटप, ओम चादर, कैलास गाढवे, शिवाजी कस्पटे, रवी कस्पटे, इत्यादींच्या स्वाक्षऱ्या आहेत. सदर मागणीचे निवेदन हे तहसीलदार राकेश गिड्डे यांनी स्वीकारले आहे. यावेळी केज येथील धनगर समाज बांधव उपस्थित होते.



# महिलांनी सर्व क्षेत्रात सक्षमपणे पुढे जावे – डॉ.जयश्री पाटील




छ.संभाजी नगर /प्रतिनिधी :– देशातील महिलांनी सर्व क्षेत्रात सक्षमपणे पुढे गेले पाहिजे असे प्रतिपादन डॉ.जयश्री पाटील यांनी वसंतराव नाईक महाविद्यालयात जागतिक महिला दिनाच्यानिमित्ताने आयोजित व्याख्यानात केले. समाजात महिलांना आजही दुय्यम दर्जाची वागणूक दिली जाते,स्त्री म्हणजे उपभोग,कष्टाचे साधन. ही पुरूषी मानसिकता बदलण्याची काळाची गरज आहे .कार्यक्रामाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव श्री. नितीनजी राठोड तर प्राचार्य डॉ. संजय शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती डॉ. जयश्री पाटील यांनी स्त्रियांच्या जागतिक प्रवासाचा आढावा घेतला. जगातील प्रमुख देश व संस्कृतीत स्त्रियांना ख्रिस्तपूर्व ते आजतागायत मिळालेले हक्क ,समानता , त्यांनी संघर्ष करून मिळवले आहेत,स्त्रीयांना आधुनिक काळात आर्थिक, सामाजिक प्रवाहात अधिकाधिक संधी मिळायला हव्यात,महिलांनी सर्व क्षेत्रात सहभाग वाढवून पुढे गेले पाहिजे असे आवाहन त्यांनी केले. प्राचार्य डॉ. संजय शिंदे यांनीही यावेळी आपले विचार व्यक्त केले ते म्हणाले की,आज स्त्रियांवरील अन्याय पूर्णपणे संपलेला नाही आजही देशात महिलावर अन्याय, अत्याचारांच्या घटना घडतात त्या थांबल्या पाहिजेत आज भारतीय स्त्रीला संघर्ष न करताच सर्व काही मिळाले आहे. शिक्षण , मतांचा अधिकार,वडिलांच्या संपत्तीत अधिकार, आंतर जातीय, आंतर धर्मिय विवाह, विधवा पुनर्विवाह, समानतेचा अधिकार हे सर्व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घटनेच्या माध्यमातून मिळवून दिले समाजव्यवस्थेशी , पुरुषप्रधान संस्कृतीशी झगडून स्त्रियांच्या हक्कांसाठी महान कार्य केले.याचा विसर पडता कामा नये. अध्यक्षीय समारोप करताना नितीन राठोड म्हणाले की,आजच्या स्त्रीला एक व्यक्ती म्हणून मुक्तपणे जगण्याची संधी मिळायला हवी , हे करतांना महिलांचे प्रतिनिधित्व वाढवण्याची गरज स्पष्ट केली. महिलांच्या सक्षमीकरणासाठी पुरुषानी प्रयत्न करणे गरजेचे आहे.महाविद्यालय हे एक समाजच आहे कारण इथे सर्व जाती धर्माचे लोक काम करतात त्यामुळे सर्वांनी महिलांना समानतेची वागणूक दिली पाहिजे असे मत त्यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाला सर्व प्राध्यापक , प्रशासकीय अधिकारी ,कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा . सुवर्णा दंडे यांनी तर आभार प्रा. जयश्री चामरगोरे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी समितीच्या सर्व सदस्यांनी सहकार्य केले

# सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्री प्रसन्न वराळे यांचे लातूर जिल्हा वकील मंडळाच्या वतीने स्वागत



लातूर :– दि. ९ मार्च २०२५ रोजी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती प्रसन्न वराळे लातूर दौऱ्यावर आले असता लातूर जिल्हा वकील मंडळाच्या वतीने शाल , पुष्पहार घालून संविधान प्रत देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी लातूर जिल्हा वकील मंडळाचे अध्यक्ष अँड शरद इंगळे, उपाध्यक्ष अँड मनीषा दिवे पाटील,अँड आनंद खांडेकर, सचिव अँड प्रदिपसिंह गंगणे, ग्रंथालय सचिव अँड विजय साबळे, सहसचिव अँड तृप्ती इटकरी, अँड नरेश कुलकर्णी, कोषाध्यक्ष अँड रोहित सोमवंशी, ज्येष्ठ विधीज्ञ बळवंत जाधव, अँड आशिष बाजपेयी, अँड संजय पांडे,अँड वैभव बिराजदार, अँड नितीन राठोड, अँड ऋषिकेश देशपांडे,, अँड ओम पेन्सलवार, अँड आदीची उपस्थिती होती.

# महिलांचा घागर मोर्चा काढण्याचा इशारा नगरपरिषद च्या नियोजन शून्य कारभारामुळे पाणी टंचाई ;



किनवट:शेख शौकत :–किनवट शहरच्या नागरीकांनी निवेदन देऊन आठवडा लोटला तरी प्रशासनाला घाम आल्याचे दिसत नाही हे उल्लेखनिय आहे. नगर उत्थान अभियानांतर्गत किनवट शहराच्या वाढीव पाणी पुरवठा नुतन नळयोजना कार्यान्वित झाली खरी मात्र कमी दाबाचा पाणी पुरवठा होत असल्याने नळाला थोडेफार पाणी येत आहे. एकीकडे उन्हाळ्याची दाहकता आणि दुसऱ्या बाजुने पाण्याच्या नगन्य पुरवठ्याला किनवटकर पुरते वैतागले असून नगरपरिषद प्रशासनाने तात्काळ सुधारणा करुन पुरक प्रमाणात पाणी पुरवठा न केल्यास नगरपरिषदेवर १५ मार्च रोजी खैरोद्दीननगर आणि साईनगरातील महिलांचा घागर मोर्चा काढण्यात येणार असल्याचे २७ फेब्रुवारी प्रशासनाला दिलेल्या निवेदनात सज्रड इशारा दिला आहे. आठवडा लोटला तर शहराच्या वाढीव पाणी पुरवठ्याच्या विस्तारीत नळयोजनेसाठी १९ कोटी ४ लाख रुपयाचा निधी खर्ची लावला आहे. जुन्या नळयोजनेद्वारे पाणी पुरवठा केला जात होता त्यावेळी मुबलक पाणी मिळायचे. आता मात्र नविन सुधारीत नळयोजना कार्यान्वित झाल्यानंतर फारच कमी दाबाचा पाणी पुरवठा होत आहे. उच्चदाबाचा पाणी पुरवठा करण्यात यावा यासाठी नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना वारंवार कळवले परंतू त्यांनी लोकांच्या ज्वलंत मागणीकडे अद्यापपर्यंत दूर्लक्षच केले आहे. २७ फेब्रुवारी रोजी अंतीम निवेदन दिले आहे. आठवडा लोटला तरी उचीत पाणी पुरवठ्यासाठी कसलीही सुधारणा केलेली दिसत नाही. मुख्याधिकारी हे असून अडचण आणि नसून खोळंबा अशा स्थितीतले दिसतात, त्यामुळे महिलांनी घागरमोर्चावर पोहोचावे लागले. उन्हाळ्याच्या सुरुवाती पासूनच उष्णतेची दाहकता वाठली आहे. मार्च महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात सूर्य आग ओकतोय त्यामुळे भूगर्भातील पाण्याच्या पातळीतही झपाट्याने घट होऊ लागल्याने घरगुती वैयक्तीक बोअरवेलची पाणी पातळी खालावली आहे. आता नळयोजनेच्या पाण्यावरच किनवटकरांची बिस्त आहे. उच्चदाबाचा पाणी पुरवठा होण्यासाठी उपाय योजना न केल्यास कांहीभागात टँकरद्वारे पाणी पुरवठ्याचे श्रीफळ फोडावे लागणार आहे. सार्वजनिक स्टँडपोस्टवर पाणी भरणाऱ्यांमध्ये ताणतणावाची स्थिती पहायला मिळण्याची भीती व्यक्त केली जात आहे. म्हणून प्रशासनाने तात्काळ उपाय योजना करुन उच्चदाबाचा पाणी पुरवठ्याची व्सवस्था करावी, अन्यथा महिलांच्या घागरमोर्चाचा सामना करण्यासाठी प्रशासनाने सज्ज रहावे, असि इशारा देण्यात आला आहे.

# मी सर्वसामान्यांचा लोकप्रतिनिधी - माजी मंत्री आ.संजय बनसोडे



उदगीर :– यावर्षीची विधानसभेची निवडणूक ही माझी तिसरी निवडणुक होती. मात्र गेल्या विधानसभेच्या निवडणुकीपेक्षा या वेळेस आपण सर्वांनी प्रचंड मतांनी निवडून देवुन जिल्ह्यात सर्वाधिक मते आपण मला दिली. तब्बल २ लाख मतापैकी १ लाख ५४ हजार मते मला मिळाली व रेकार्डब्रेक अशा ९३ हजार मतांनी मी विजयी झालो असलो तरी साडेतीन लाख सर्वसामान्य नागरिकांचा मी लोकप्रतिनिधी असल्याचे मत माजी क्रीडा मंत्री आ.संजय बनसोडे यांनी व्यक्त केले. उदगीर तालुक्यातील टाकळी येथे आयोजीत अखंड हरिनाम सप्ताह निमित्त दर्शन व नागरी सत्कार सोहळ्याप्रसंगी बोलत होते. यावेळी धनाजी टाकळीकर, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष बालाजी भोसले, प्रा.श्याम डावळे, जळकोटचे भाजपा तालुकाध्यक्ष सत्यवान पांडे, देऊळवाडीचे सरपंच शुभम केंद्रे, दिगबंर टाकळीकर, गजानन टाकळीकर, सुखानंद बोईनवाड, मनोहर पाटील, कुशालगिर गिरी, पांडु पांचाळ, गणु महाराज जांबळवाड, रामराव मानकोळे, माधव पाटील, बालाजी बोईनवाड, संजु सगर, सीताराम दैठणे, बालाजी एकुंडे, बालाजी निलेवाड, दर्शन बोईनवाड, प्रशांत राठोड, गोविंद बोईनवाड, आदी उपस्थित होते. पुढे बोलताना आ.संजय बनसोडे यांनी, गेल्या ५ वर्षाच्या काळात मतदार संघाचा सर्वांगीण विकास केला असुन त्यामध्ये सर्व शासकीय इमारती, शहराला जोडणारे सर्व रस्ते हे राष्ट्रीय महामार्गाने जोडले, पिण्याचा पाण्याचा प्रश्न, विविध समाजाचे भवन, भुमीगत गटार, एम.आय.डी.सी. आदी मंजूर करुन उदगीरच्या विकासात मागील काळात भर टाकली असुन भविष्यात आपला उदगीर तालुका हा जिल्हा करण्याच्या दृष्टीने काम केले आहे. भविष्यात पिकविमा, अपंगाच्या समस्या, कोल्हापुरी बंधारे , शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्यासाठी प्रयत्न करणार असून त्याही समस्या लवकरच सोडवणार आहे. ८१० कोटींचा उदगीर ते रावी – देगलुर हा राष्ट्रीय महामार्ग मंजूर केला असुन त्याचेही काम लवकरच सुरु होणार असल्याचे आ.संजय बनसोडे यांनी सांगितले. यावेळी महिला दिनानिमित्त आ.संजय बनसोडे यांच्या हस्ते ज्येष्ठ माता – भगिनींचा सत्कार करण्यात आला. यावेळी अंबादास तुंकलवाड, विश्वनाथ भुनकवाड, अजय सगर, ज्ञानोबा शेळके, विलास अरदवाड, चंदर कारभारी, चंचळबाई निलेवाड, शेषाबाई तेलंगे, बायनाबाई चोपवाड, महादेवीबाई एलेवाड, सोमित्रा ऐलवाड, कस्तुराबाई करकाळे, अनुसयाबाई डिचमवाड आदीसह टाकळी गावातील व पंचक्रोशीतील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनासाठी तीन दिवशीय धरणे आंदोलनास विविध पक्ष संघटनांचा पाठिंबा





उदगीर :– महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनास पाठिंबा देण्यासाठी उदगीर येथील बोध्द समाजाच्या वतीने तीनदिवशीय महाधरणे आंदोलन केले. या आंदोलनास विविध पक्ष व संघटनांनी पाठिंबा देवून महाबोधी महाविहार बोध्दांच्या ताब्यात द्यावे आशी मागणी केली. उपजिल्हाधिकारी यांच्या मार्फत महामहिम राष्ट्रपती, प्रधानमंत्री व मुख्यमंत्री यांनी आपल्या भावना कळवल्या आहेत. बिहार राज्यातील बुध्दगया येथील महाबोधी महाविहार हे बोध्द बांधवांचे श्रध्दास्थान असून या विहारावर हिंदू धर्मियांनी ताबा मिळविला आहे. त्यामूळे हिंदू धर्मियांच्या ताब्यातून बोध्द विहार बोध्द भिकूच्या ताब्यात द्यावे यासाठी जगभरातील बोध्द समाज एकवटला असून ठिकठिकाणी आंदोलन करीत आहेत. त्यास पाठिंबा देण्यासाठी उदगीर येथील बोध्द समाज दि. ४ मार्च ते ६ मार्च याकाळात उपजिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले. यावेळी बाबासाहेब सुर्यवंशी, मागासवर्गीय सेवानिवृत्त संघटनेचे तालुकाध्यक्ष मातीरावे पुंडलीक, उपाध्यक्ष शृंगारे भानुदास व पदाधिकारी, विद्यासागर डोळनाळीकर, प्रा. डॉ.शिवाजीराव देवनाळे, डॉ. अंजुम खादरी, अभियान प्रमुख संजयकुमार, मैनोद्दिन पठाण, श्रावण किंवंडे, ड. भालेराव जयवर्धन,ड. वर्षा कांबळे, संजय बोरगावे, उत्तम पकोळे, अँड वर्षा बनसोडे, प्रकाश कांबळे, व्यंकट बर्गे, प्रा. सुदर्शन मसुरे, सुनील पकोळे,ड. अमोल तलवाडकर, सरपंच राजकुमार बिराजदार, प्रमे तोगरे, व्यंकट नेत्रगांवकर, भारतीय बौध्द महासभेचे एन. सी. कांबळे ड. श्रावण माने, प्रशांत सुर्यवंशी, मनोज जोगदंड, शरद कांबळे, गौतम गायकवाड, महेंद्र सुर्यवंशी, शिवकुमार कांबळे यशोदीप सुर्यवंशी, बाबासाहेब कांबळे,प्रतीक गायकवाड, संग्राम गायकवाड, दशरथ वाघमारे आदींसह समाजबांधव मोठ्या संख्येने तीन दिवस सहभाग नोंदवून आपल्या भावना व्यक्त केल्या.

# स्वातंत्र्य हे मूल्य प्रा. कुरुंदकर यांची जीवननिष्ठा –प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार




नांदेड :– प्रा. कुरुंदकर यांनी नेहमीच स्वातंत्र्य या मूल्याचा पुरस्कार केला. समाजातील सर्वांना स्वातंत्र्य उपभोगता आले पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. म्हणजेच स्वातंत्र्य हे मूल्य त्यांच्या जीवननिष्ठेचा अविभाज्य भाग होते असे प्रतिपादन तत्त्वज्ञानाचे गाढे अभ्यासक प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांनी आज येथे केले. भारतीय राज्यघटनेच्या अमृत महोत्सवानिमित्त नरहर कुरुंदकर प्रगत अध्ययन व संशोधन केंद्राच्यावतीने 'प्रा. नरहर कुरुंदकर यांच्या विचारातील सांवैधानिक मूल्ये' या विषयावर एक विशेष व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली आहे. त्यात पाचवे पुष्प गुंफताना 'प्रा. नरहर कुरुंदकर यांचे स्वातंत्र्यविषयक विचार' या विषयावर ते बोलत होते. आपल्या विवेचनात प्राचार्य डॉ. कुंभार यांनी प्रा. कुरुंदकर यांना अभिप्रेत असलेल्या स्वातंत्र्याच्या आशयाची सविस्तर चर्चा केली. मानवी समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी तसेच प्रत्येक व्यक्तीच्या क्षमतांच्या विकासासाठी स्वातंत्र्याची आवश्यकता आहे असा आग्रह प्रा. कुरुंदकर यांनी कायमच धरला होता. स्वातंत्र्यामुळेच समाजाची वैचारिक आणि सांस्कृतिक उंची वाढते अशी देखील त्यांची धारणा होती. स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नाही आणि मानवी वर्तनाला काही बंधने आवश्यक आहेत असेही प्रा. कुरुंदकर यांचे म्हणणे होते. काही मंडळींकडून स्वातंत्र्याचा दुरुपयोग होतो हे देखील त्यांना मान्य होते. मात्र त्यामुळे स्वातंत्र्याचा संकोच करणे समर्थनीय ठरत नाही असेही ते म्हणत असत असेही प्राचार्य डॉ. कुंभार म्हणाले. प्रा. कुरुंदकर यांना स्वातंत्र्याची जी संकल्पना अभिप्रेत होती त्यावर उदारमतवाद, मार्क्सवाद आणि गांधीवाद या विचारसरणीचा प्रभाव होता असे प्राचार्य डॉ. कुंभार यांनी उपस्थितांच्या निदर्शनास आणून दिले. म्हणूनच समाजातील सर्वांना स्वातंत्र्याचा उपभोग घेता यायचा असेल तर त्यांच्या प्राथमिक गरजा पूर्ण होणे ही त्याची पूर्व अट होय. यासाठी समाजाची अर्थरचना बदलणे आवश्यक ठरते अशीच त्यांची धारणा होती. तसेच प्रा. कुरुंदकर यांनी स्वातंत्र्य आणि जबाबदारी यांची देखील सांगड घातली. किंबहुना कर्तव्यभावना आणि जबाबदारी याशिवाय स्वातंत्र्य असूच शकत नाही अशी मांडणी त्यांनी केल्याचे प्राचार्य डॉ. कुंभार यांनी दाखवून दिले. डॉ. अशोक सिद्धेवाड यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. तसेच वक्त्यांचा परिचय करून दिला. नरहर कुरुंदकर प्रतिष्ठानचे विश्वस्त डॉ. श्रीनिवास पांडे यांनी स्वागत केले.

# तीनशे पासष्ट दिवस महिलांचा सन्मान केला पाहिजे – प्रा. डॉ. अशोक मोटे



मुरुड / महेंद्र आल्टे : ०८ मार्च हा जागतिक महिला दिन म्हणून जगभर साजरा केला जातो. परंतु जागतिक महिला दिन हा एक दिवसाचा सोहळा म्हणून साजरा करू नये तर तीनशे पासष्ट दिवस महिलांना समानतेची , आदराची व न्यायाची वागणूक दिली पाहिजे. असे उद्गार स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे सिनेट सदस्य प्रा. डॉ.अशोक मोटे यांनी काढले.

मुरुड येथील संभाजी महाविद्यालयात सावित्रीबाई फुले युवती मंचाच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त घेण्यात आलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक काळम होते. विचारमंचावर प्रा. सौ. कदम एम. एस. , प्रा. गायकवाड एम.बी., सावित्रीबाई फुले युवती मंचाची अध्यक्ष कु. गौरी पटाडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना ते असे म्हणाले की संख्येने ५०% असणाऱ्या महिलांच्या सहभागाशिवाय कुटुंब , समाज आणि राष्ट्राचा विकास होणार नाही. म्हणून स्त्रियांना त्यांचे हक्क व अधिकार उपभोगण्याचे स्वातंत्र्य पुरुषांनी महिलांना दिले पाहिजेत.

अध्यक्षीय समारोप प्रसंगी बोलताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक काळम म्हणाले की , मुलगा अविवाहित आहे तोपर्यंत तो आपल्या आई वडिलांसोबत अत्यंत प्रेमाने राहतो म्हणून एकाही अविवाहित मुलाचे आई वडील अनाथआश्रमात नाहीत पण विवाहित मुलांचेच आई वडील अनाथ आश्रमात का राहतात ? या बाबीचा जागतिक महिला दिनानिमित्त महिलांनी गांभीर्याने विचार करावा.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. सौ. कदम एम. एस. यांनी केले. तर पाहुण्यांचा परिचय प्रा. गायकवाड एम. बी. यांनी करून दिला. यावेळी सावित्रीबाई फुले युवती मंचाची अध्यक्ष कु. गौरी पटाडे या विद्यार्थिनीने आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.पठाण तब्बू या विद्यार्थिनीने केले तर उपस्थितांचे आभार हिंगे संदेश या विद्यार्थ्याने मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रा. सौ. कदम एम. एस. व प्रा. डॉ. गोरे बी. एम. यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास प्रा. डॉ. रणदिवे डी. एम. , प्रा. डॉ. चावरे एम. व्ही. , प्रा. डॉ. जाधव जी. एल. , प्रा. मकरंद गिरी प्रा . उपाडे विजयकुमार व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE